# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प

जा.क्रं.एआयसीआरपीडीए/५१९ /२०१६

दिनांक २६.०९.२०१६

## जाहीर प्रगटन

**विषयः- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. १३/१०/२०१६ ते २०/१०/२०१६ रोजी आयोजित अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाच्या आठ दिवसीय प्रशिक्षण वर्गानिमित्य शास्त्रज्ञाना चहा,अल्पोपहार व भोजन देणे बाबत...**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. १३/१०/२०१६ ते २०/१०/२०१६ या कालावधीत आयोजित अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पा अंतर्गत आठ दिवसीय प्रशिक्षण वर्गात सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थी अधिकारी, कर्मचारी तसेच प्रशिक्षण देण्यासाठी येणारे शास्त्रज्ञ व इतर मान्यवर यांच्यासाठी चहा, अल्पोपहार व भोजन देण्याचे नियोजीत आहे. यासाठी जाहिर प्रगटनाद्वारे निवीदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कालावधी | चहा/अल्पोपहार/जेवणाचा तपशील | दर रू. |
|---|---|---|---|
| १ | दि. १३/१०/२०१६ ते दि. २०/१०/२०१६ | बेड टि सकाळी ६.३० ते ७.३० वाजता | |
| २ | दि. १३/१०/२०१६ आणि दि. २०/१०/२०१६ | (हाय टि) मिनी समोसा, आलू चिप्स, काजुकतली, मारी गोल्ड, गुड डे बिस्कीट, चहा/कॉफी. | |
| ३ | दि. १३/१०/२०१६ | **नास्ता** : उपमा शेव, चटणी ,ब्रेड, बटर, जाम व चहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : सलाद,आचार,पनीर टिक्का,भिंडीफ्राय, दाल तडका, जीरा राईस ,चपाती, मसाला सेव व फ्रुट सल्हाड. | |
| | | **रात्रीचे जेवण** : कचुंबर, दोडका मसाला ,मुग दाल फ्राय, पालक भाजी ,चपाती, राईस,आचार व टेचा. | |
| ४ | दि. १४/१०/२०१६ | **नास्ता** : आलु पराठा, दही, ब्रेड, बटर, जाम व चहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : मटकी मिसळ, पाईनॅपल चटणी, येसर वडी, तव्वा भाजी, व्हेज फुलाव, जवार रोटी, चपाती, डिस्को पापड व गुलकंद जामुन. | |
| | | **रात्रीचे जेवण** : आलु टोमॅटो, पनीरचीज बॉल, दाल, राईस, चपाती, शेंगदाना चटणी व आचार. | |
| ५ | दि. १५/१०/२०१६ | **नास्ता** : डोकळा, इडली श्रेव/चटणी, ब्रेड, जाम, बटर व चहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : कचुंबर ग्रीन चटणी, व्हेज दिवानी हंडी, ग्रीन पीज, ड्राय मुगदाल मखाणी, राईस, पराठा, पापड, कत्रनृ व शिताफल रबडी. | |
| | | **रात्रीचे जेवण** : बेसन बैंगन भरता, कडी खीचडी, ज्वार रोडी, चपाती, कांदा सलाद, आचार व ठेचा. | |
| ६. | दि. १६/१०/२०१६ | **नास्ता** : कटलेट, स्वास, चटणी, ब्रेड,बटर, जाम व चाहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : कोंशिबीर, टोमॅाटो चटणी, लसुण पालक, चना मसाला, ग्रीन राईस, चपाती, रायता व जिलेबी. | |
| | | **रात्रीचे जेवण** : शिमला आलु, पनीर मराठा ,व्हेज दम बिर्याणी , रायता, चपाती, पापड व सलाद. | |
| ७. | दि. १७/१०/२०१६ | **नास्ता** : ईडली साबर, चटणी, ब्रेड , जाम व चहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : कंचुबर, आचार, बैंगन मसाला, जिरा आलु, मिकस दाल, राईस, चपाती ,खारी बुंदी व आंगुरी. | |
| | | **रात्रीचे जेवण** : पालक पनीर, भेंडी फ्राय, दाल फ्राय, राईस, चपाती व नट सलाद. | |
| ८. | दि. १८/१०/२०१६ | **नास्ता** : अंडा ऑमलेट,आलु वडा, ब्रेड, बटर, जाम व चाहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : सलाद, आलु मटर, टोमॅटो, शेवगा मसाला, उडीद दाल तडका, राईस, चपाती, चिल्लीकट व पाईनॅपल राजभोग | |
| | | **रात्रीचे जेवण** : व्हेज कडई, शिंदी आलु बैगन, दालखिचडा, पराठा, आचार व सलाद. | |
| ९. | दि. १९/१०/२०१६ | **नास्ता** : छोला भटोरा, ब्रेड, बटर ,जाम व चहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : कचुंबर, गोबी टोमॅटो, दाल फ्राय, पिज फुलाव, पराठा,पापड फ्राय, पनीर बटर मसाला व मुगदाल शिरा. | |
| | | **रात्रीचे जेवण** : करेला, मटकी आलु, जिरा राईस,भजे, चपाती, पापड, कोंशिबीर व दाल. | |
| १०. | दि. २०/१०/२०१६ | **नास्ता** : दही पोहा, कांदा शेव ,लिंबु ब्रेड, बटर ,जाम व चहा. | |
| | | **दुपारचे जेवण** : सलादा मिक्स वेज, वराडी कोपता, चनादाल तडका,जिरा राईस, चपाती,शेव व जामुन. | |
| | | **रात्रीचे जेवण** : चवळी,बैंगनभरता,कडी राईस,चपाती,आचार,तिळचटणी व पापडफ्राय. | |

तरी वरील विवरणानुसार पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांनी दरपत्रक नमुना व संबंधीत अटी आणि शर्तीसह, सचिव, आयोजन समिती तथा प्रभारी अधिकारी, अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी दि. ०४/१०/२०१६ दुपारी ०३ वाजेपर्यंत यांच्या कार्यालयात सादर करावेत. अटी व शर्ती पान.क्र २ व ३ वर सोबत जोडलेल्या आहेत.

अध्यक्ष
अल्पोपहार व भोजन समिती तथा प्रभारी अधिकारी
संकरीत गो पैदास प्रकल्प, वनामकृवि, परभणी

प्रत:

१. नोटीस बोर्ड संचालक संशोधनालय, वनामकृवि, परभणी
२. नोटीस बोर्ड प्रभारी अधिकारी, अ.भा.स कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, वनामकृवि, परभणी
३. नोटीस बोर्ड प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी

## दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१. अल्पोपहार उत्कृष्ठ व दर्जेदार मालापासून निर्माण करणे अनिवार्य आहे तसेच अल्पोपहार निर्मितीकरीता वापरण्यात येणारे साहित्य (भांडी) स्वच्छ असावी.

२. उपरोक्त अल्पोपहाराचे सेवन केल्यास आरोग्यास कुठलाही धोका होणार नाही याची पदार्थ तयार करतेवेळी काळजी घ्यावी. आरोग्यास हानी पोहचल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल.

३. सुयोग्य सेवा मिळण्यासाठी अल्पोपहार वाटप करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच वाटप करण्यासाठी सेवकांची नियुक्ती करावी लागेल. सदर सेवक हे विनम्र सेवा देणारे असावेत तसेच सेवक स्वच्छ गणवेशात असणे आवश्यक आहे.

४. ज्या कंत्राटदाराचे अथवा प्रतिष्ठानाने अशा किंवा या पेक्षा मोठया जेवणाचे/अल्पोपहार वाटपाचे कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले असतील त्याचे अनुभव प्रमाणपत्र द्यावे. अशा कंत्राटदारास प्राधान्य देण्यात येईल.

५. जेवण, चहा व अल्पोपहार निर्देशित केलेल्या वेळेत व ठिकाणी पोचविण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल.

६. भाजी प्रमाणबध्द तिखटामध्ये तसेच उच्चप्रतिच्या डबल फिल्टर तेलात करणे आवश्यक आहे.

७. कंत्राटदारास कुठल्याही प्रकारचा आग्रीम मिळणार नाही.

८. जेवणाच्या हॉलमध्ये शुध्द (आरओ) पाण्याचे व्यवस्था करावी लागेल.

९. बेड टि ची सोय निवास स्थानी करणे बंधनकारक राहील.

१०. जेवणाच्या हॉलमध्ये ३० फायबर खुर्च्या व ३ टेबल टाकणे आवश्यक आहे.

११. जेवणाची व्यवस्था हॉलमध्ये सजावट करून बफे पध्दतीने करणे.

१२. कंत्राटदाराच्या त्याच्या देयकाची अदायगी धनादेशाद्वारे करण्यात येईल. त्यासाठी त्यांचे प्रतिष्ठानाच्या नावे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. वैयक्तीक व्यक्तीच्या नावे धनादेश देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१३. कंत्राटदारास कामगार कायद्याचे सर्व नियम पाळणे आवश्यक आहे.

१४. नियमाप्रमाणे सेवा कर इ. कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१५. निर्देशाप्रमाणे जेवण, चहा व अल्पोपहाराच्या पदार्थाची चव व व्यवस्थे बाबत त्रुटी आढळून आल्यास योग्य तो दंड आकारण्यात येईल.

१६. अटी व शर्तीसहीत कोरे दरपत्रक रू. ३००/- रोखीने भरणा करून प्रभारी अधिकारी, कोरडवाहु शेती संशोधन केंद्र यांच्या कार्यालयातून दि. २६/०९/२०१६ ते दि. ०४/१०/२०१६ रोजी दुपारी ०५ वाजेपर्यंत प्राप्त करून घेणे.

१७. सीलबंद लिफाफा A मध्ये खालील कागद पत्रांच्या सत्यप्रती असणे आवश्यक आहे.

a. शॉप ॲक्टप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र
b. आयकर पॅनकार्ड किंवा आयकर निपटारा प्रमाणपत्र(फॉर्म नं. ४१५)
c. अन्न व औषधी विभाग महाराष्ट्र शासन यांचे खाद्यविक्रेते प्रमाणपत्र
d. व्यावसायिक कर नोंदणी प्रमाणपत्र

e. सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र

f. मुल्यवर्धित कर (व्हॅट) नोंदणी प्रमाणपत्र

g. अनुभव प्रमाणपत्र

h. अटी व शर्ती मान्य असल्याचे हमी पत्र (रू. १०० च्या बाँडवर).

१८. सीलबंद लिफाफा B मध्ये दरपत्रक असणे आवश्यक आहे.

१९. दरपत्रक उघडणे बाबतच्या तारखेत बदल करण्याचे स्वातंत्र्य भोजन समितीस राहील.

२०. दरपत्रक संबंधी काही वाद निर्माण झाल्यास परभणी न्यायालयांतर्गत अधिन राहून सोडविण्यात येईल.

२१. .दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा पुर्ण अधिकार कोणतीही पुर्वसुचना न देता भोजन व अल्पोपहार समितीने राखून ठेवला आहे.

२२. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

२३. यशस्वी दरपत्रधारकास सुरक्षा ठेव अनामत रक्कम व्यतिरिक्त म्हणून रू. २,०००/- (अक्षरी रू- दोन हजार केवळ) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष/डिडि **नियंत्रक, वनामकृवि, परभणी** यांचे नावे जमा करावा लागेल.

२४. जेवण,चहा व अल्पोपहार समाधानकारक पुरवठा केल्यावरच देयकाची अदायगी करण्यात येईल.

**अध्यक्ष**
अल्पोपहार व भोजन समिती तथा प्रभारी अधिकारी
संकरीत गो पैदास प्रकल्प, वनामकृवि, परभणी